क्र.३७४(२)/विद्युत/२०१९/१४-ब **दिनांक - १७ ऑगस्ट,२०२०**

# महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९
# जाहिरात क्र.१८/२०१९

## घोषणा

महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ या पदाच्या मुलाखती दिनांक १० सप्टेंबर, २०२० व ११ सप्टेंबर, २०२०या कालावधित मुंबई येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून त्यामध्ये मुलाखतीचा दिनांक, ठिकाण व वेळ नमूद करण्यात आली आहे. सध्या नोवेल कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव असल्याने उमेदवारांनी मुलाखतीस येताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) मुलाखतीला उपस्थित राहणाऱ्या सर्व उमेदवारांनी पूर्णवेळ किमान ३ पदरी कापडाच्या मास्क (Mask) चा वापर करणे अनिवार्य आहे.

२) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

३) उमेदवारांकडे स्वतःचा सॅनिटाईझर ( Sanitizer) असावा व त्याचा वापर आवश्यकतेनुसार करावा.

४) उमेदवारांनी शारीरिक / परस्पर अंतराचा ( Social Distancing ) नियमावलीच कटाक्षाने पालन करावे.

५) मुलाखतीला येताना उमेदवाराने शक्यतो एकटे यावे, सोबत नातलगांची गर्दी होवू नये, याची दक्षता घ्यावी.

६) उमेदवारास कोव्हिड-१९ सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इ. दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.

७) जंतू संसर्ग टाळण्यासाठी हात न धूता नाक, तोंड व डोळे याना स्पर्श करणे टाळावे.

८) उमेदवार टिश्यू पेपर वापरत असल्यास वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.

९) शासनाने कोव्हिड-१९ प्रादूर्भाव वाढू नये यासाठी शासनाकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव (परीक्षा-२),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**